प्रेसनोट

दि. २६/१०/२०१८

दक्षता जनजागृती सप्ताह-२०१८

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे

---

राज्यामध्ये प्रतिवर्षी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दि.३१ ऑक्टोबर या जन्म दिवसापासून एक आठवडा दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. या वर्षी दिनांक २९ ऑक्टोंबर २०१८ ते ०३ नोव्हेंबर २०१८ या दरम्यान केंद्रीय दक्षता आयोग व महाराष्ट्र शासनातर्फे राज्यभर ''दक्षता जनजागृती सप्ताह'' साजरा करण्यात येत आहे.

दक्षता जनजागृती सप्ताहाचे निमित्ताने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे विभागाकडून दिनांक २९/१०/२०१८ ते दिनांक ०३/११/२०१८ या कालावधीमध्ये पुणे शहरामध्ये व पुणे जिल्हयात पुढील प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

- दिनांक २९/१०/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे दक्षता जनजागृती सप्ताहाच्या अनुषंगाने भ्रष्टाचार निर्मुलन संबंधाने शपथग्रहण करून सप्ताहास प्रारंभ करण्यात येणार आहे.
- शाळा व महाविद्यालयांमध्ये दक्षता जनजागृतीचे संबंधाने वत्कृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा यांचे आयोजन करण्यात येणार आहे.
- पुणे शहर व पुणे जिल्हयात या सप्ताहाच्या निमित्ताने भ्रष्टाचार विरोधी जनजागृती करण्यासाठी मोठया प्रमाणात पोस्टर्स, बॅनर्स व स्टीकर्स लावण्यात येणार असुन ग्रामिण भागातील जास्तीत जास्त लोकांना तालुका ठिकाणी एकत्रीत करून या कार्यालयाकडील अधिकारी यांचे नियोजनाखाली मेळावे आयोजित करण्यात येणार असुन समाजामध्ये सार्वजनिक निधीचा विनियोग सुयोग्य पद्धतीने व्हावा त्यामध्ये भ्रष्टाचार होवू नये व होत असल्यास त्याबाबतची माहिती तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागास द्यावी याबाबत प्रबोधन करण्यात येणार आहे.
- पुणे शहरातील शाळा विशेषतः महाविद्यालय यामध्ये **Eradicate corruption - Built a New India** (भ्रष्टाचार मिटाओ - नया भारत बनाओ) हि संकल्पना (**Theme**) घेवून परिसंवाद आयोजित करण्यात येणार आहेत.
- पुणे शहरातील बँका, इंन्शुरन्स कंपनी तसेच माहिती व तंत्रज्ञान संबंधित सर्व शाखा, सेवाभावी संस्था, जेष्ठ नागरिक संघटना येथे जनजागृती करण्यात येणार आहे. क्रिडा क्षेत्राशी संबंधित सर्व संस्था, शालेय शिक्षण संस्था यांचे माध्यमातून भ्रष्टाचार विरोधी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे.
- पुणे शहर व जिल्हयात सर्व शासकिय कार्यालयाचे बाहेर दर्शनी भागात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडील संपर्क क्रमांक व पत्ता असलेले फलक लावणेबाबत संबंधितांना कळविण्यात येणार असुन केले कार्यवाही बाबत खात्री करून घेण्यात येणार आहे.
- भ्रष्टाचाराच्या विरोधात समाजा मध्ये जनजागृती व्हावी, भ्रष्टाचार मुक्त नवभारत, नवमहाराष्ट्र निर्माण व्हावा शासनाच्या निधीचा विनियोग हा योग्य रितीने व्हावा तसेच शासकिय कार्यालयांमध्ये नागरिकांची त्यांचे कायदेशीर कामा संदर्भात लोकसेवकाकडून होणारी अडवणूक व त्याअनुषंगाने होणारा भ्रष्टाचार रोखण्यासाठी जनजागृती सप्ताहा मध्ये प्रबोधन करणे हा उद्देश आहे.
- भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी सर्व नागरिकांनी पुढे यावे याकरीता या सप्ताहा मध्ये जास्तीत जास्त नागरीकांपर्यंत पोहचण्याचे उद्दीष्ट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून ठेवण्यात आलेले आहे. याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे पोलीस अधीक्षक, श्री. संदीप दिवाण यांनी पुणे शहर व जिल्हयातील सर्व नागरिकांना भ्रष्टाचार विरोधी जनजागृती करण्याच्या या कार्यक्रमास सहयोग द्यावा असे आवाहन केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४

२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३.

३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३

४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००

५. ई-मेलआयडी- पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in

६. फेसबुकपेज- www.facebook.com-maharashtraACB

७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

८. **Mobile App - www.acbmaharashtra.net**

सहाय्यक पोलीस आयुक्त / पोलीस उप अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे

(सुहास नाडगौडा)

सहाय्यक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.